# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

## P.R.O. Office, Palghar

Phone No. 02525-297032, Mob No.8669604078
Address: SP Office, Bidco Road, Palghar(W)
E-mail : propalghar@gmail.com

**प्रेसनोट** दि.२१/०६/२०१८

## पालघर जिल्हा पोलीस दलातर्फे पोलीस कल्याण सप्ताहाचे अनुषंगाने पोलीसांना मदत करणारे नागरिकांचा सत्कार केलेबाबत

सध्या पोलीस दलामध्ये पोलीस कल्याण सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. त्या सप्ताहाचे अनुषंगाने पोलीस अधिकारी कर्मचारी व त्याचे कुटुंबियांकरिता विविध कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. दिनांक २०/०६/२०१८ रोजी पोलीस कल्याण वार्षीक सप्ताहाचे औचित्य साधुन पालघर जिल्हा पोलीस दलाचे वतीने मा.श्री.मंजुनाथ सिंगे, जिल्हा पोलीस अधीक्षक पालघर यांचे संकल्पनेतुन गुणवंत पोलीस पाल्याचा सत्कार व महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने पोलीसांना मदत करणारे नागरिकांचा सत्कार करण्यात आला.

पालघर येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमामध्ये दि.१७/०६/२०१८ रोजी केळवा पोलीस ठाणे हद्दीमध्ये नालासोपारा येथुन ०७ मुलांचा ग्रुप केळवा बीच येथे आला होता त्यामध्ये समुद्रामध्ये पोहण्यास गेलेल्या ०४ मुलांचा बुडुन दुर्दैवी मृत्यु झाला त्यावेळी **शैलेश भट रा.पालघर** यांनी सदर घटनेवेळी पोलीसांना योग्य मदत केली. पालघर जिल्हयामध्ये बाहेरुन मागविण्यात येणा-या पोलीस बंदोबस्तास येणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची राहण्याची व्यवस्था अंबामाता ट्रस्ट चे हॉलमध्ये करण्यात येते. **अंबामाता ट्रस्टच्या वतीने हार्दीक पटेल व केतन पटेल रा.पालघर** यांचा सत्कार करण्यात आला. लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगाने बाहेरील जिल्हयातुन मोठया प्रमाणाम बंदोबस्त मागविण्यात आला होता त्यावेळी रात्रौअपरात्री पोलीस अधिकारी व कर्मचारी पालघर येथे येत होते त्यावेळी त्यांना **पुनम हॉटेलचे मालक पुर्वेश** यांनी सदरचे अधिकारी कर्मचारी यांची जेवणाची व्यवस्था वेळी अवेळी केली होती तसेच माहे मार्च २०१८ मध्ये तुळींज पोलीस ठाणे हद्दीमध्ये राहणारी **कु. भाग्यश्री विठ्ठल झाबरे हीने घरफोडी करणारे आरोपित यांना पकडुन दिले होते.** यांचा सत्कार मा. श्री.मंजुनाथ सिंगे, पोलीस अधीक्षक पालघर यांचे हस्ते करुन त्यांना प्रशस्ती पत्रक देण्यात आले. सदरचे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन मा.सौ.मेघश्री मंजुनाथ सिंगे, तसेच प्रमुख पाहुणे म्हणुन मा.डॉ.सौ.कांचन वानेरे, तसेच डॉ.सौ.उज्वला काळे, मा.श्री.मंजुनाथ सिंगे, पोलीस अधिक्षक पालघर, मा.श्री.राजतिलक रोशन अपर पोलीस अधीक्षक वसई, मा.श्री.योगेश चव्हाण अपर पोलीस अधीक्षक, पालघर मा.श्री.जयंत बजबळे उपविभागिय पोलीस अधिकारी विरार, मा.श्री.दत्ता तोटवाड उपविभागिय पोलीस अधिकारी नालासोपारा, मा.श्रीम.अश्विनी पाटील उपविभागिय पोलीस अधिकारी वसई, तसेच सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी व कर्मचारी असे उपस्थित होते.